**सं.फौ. ख. क्र. ३२०/२०१७**
**मिना वि. मदन**
**निशाणी क्रमांक – ३९ वर पुढे**

**<u>आरोपी तर्फे साक्षदार क्र. १ चा उलट तपास फिर्यादीतर्फे अधिवक्ता श्री पी.व्ही. बांते यांच्यातर्फे</u>**

माझे शिक्षण इयत्ता ८ वी पर्यत झालेले आहे. मी हिवराबाजार या गावात शिकलो आहे. मी हिवरा बाजार येथे मुळचा रहिवाशी आहे. हिवरा बाजार येथे माझी शेती आहे. माझी शेती वडीलोपार्जीत आहे. हिवरा बाजार येथे बॅक ऑफ इंडियाची शाखा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर बॅक ऑफ इंडिया येथे मी दप्तरी या पदावर कर्मचारी होतो.

हे म्हणणे खरे नाही की, सदर बॅक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये माझे दोन खाते होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यातील एका खात्याचा नं. ८७३८१११००००११६ व दुस–या खात्याचा नं.८७३८२६१००००२०१४ असे होते. साक्षीदार सांगतो की निवृत्त झाल्यानंतर खाते क्रमांक ८७३८२६१००००२०१४ बंद केला होता. सदर खाता हे ओव्हर डाफ्ट खाते होते म्हणून मी बंद केले होते. सदर खात्यासंबंधी मी चेकबुक घेतले होते. त्या चेकबुकचे मी वापर केलेला आहे.

हे म्हणणे खरे नाही की, सन २०१६ मध्ये मी घराचे बांधकाम सुरु केले होते. साक्षीदार सांगतो की, सन २०१६ च्या पूर्वी मी घराचे बांधकाम सुरु केले होते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी हि बचत गटाचे काम करीत होती. हे मला माहिती नाही की, ती बचत गटाची अध्यक्ष होती किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी हिचे आमच्या बॅकेत खाते होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे माझी फिर्यादीसोबत ओळख होती. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१६ मध्ये ज्यावेळेस मी घर बांधण्यास सुरुवात केली त्यावेळेस मला पैश्याची गजर होती म्हणून मी दिनांक १५–०७–२०१६ रोजी फिर्यादी हिच्याकडून रक्कम रुपये ६०,०००/– हातउसने घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर सप्टेंबर २०१६ मध्ये मी घराच्या स्लॅब करीता फिर्यादी हिच्या कडून रक्कम रुपये १,००,०००/– हातउसने घेतले होते. साक्षीदार सांगतो की, त्यावेळेस मी निवृत्त झालो होतो म्हणून मला पैसे मिळाले होते म्हणून मी फिर्यादी हिच्याकडून पैसे हातउसने घेण्याची गरज नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादी हिच्याकडून एकूण रक्कम रुपये

१,६०,०००/– हातउसने घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर रक्कम परतफेडीकरीता फिर्यादी हिला बॅक ऑफ इंडिया शाखा हिवराबाजार, येथील धनादेश क्र.००३३५२ रुपये १,६०,०००/– चा दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर धनादेश सदरील खात्यात पैसे नसल्याने परत आला. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी हिने दिनांक १३.०४.२०१७ रोजी वकिल श्री मेश्राम यांच्या मार्फत मला नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीसीला मी माझे उत्तर दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादी हिच्याकडून रुपये १,६०,०००/– हातउसने घेतले होते म्हणून मी नोटीसला उत्तर दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, अरुण सिताराम चव्हाण यांचा आर्थीक व्यवहार माझ्या पत्नीसोबत झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर घराचा करारनामा माझ्या पत्नीने अरुण सिताराम चव्हाण यांच्यासोबत केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या प्रतिज्ञापत्रात अरुण सिताराम चव्हाण याच्या सोबत झालेल्या व्यवहाराबाबत जे काही लिहिलेले आहे ते खोटे लिहिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादी कडून पैसे घेतलेले असून ते कायदेशिररित्या मला देणे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथत्रात जो काही मजकूर लिहिलेला आहे तो खोटा लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

रामटेक

दिनांक –०३/१२/२०२२.

**(श्रीमती. डी. एस. सैंदाणे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

रामटेक